**निवेदन**

आपल्या प्रभागातील समस्या, दैनंदिन अडचणी, फसवणूक, अन्याय-अत्याचार, मुजोरी तसेच आपल्या मनातील सूचना, शंका, उपाय यासाठी सा. संघर्षाचा आवाज आपणास खास व्यासपीठ मिळवून देत आहे.
करा त्वरा, होऊ द्या मनातला निचरा!
संपर्क : ७२७६८७१००८

साप्ताहिक

# संघर्षाचा आवाज

प्रशासकीय व सामाजिक व्यवस्थेचा समतोल साधणारा...

पुणे, ठाणे आणि मुंबईसह महाराष्ट्रातील घडामोडींचा वेध घेणारे वृत्तपत्र

संपादक : संजय सोनवणे

■ RNI. NO. MAHMAR/2013/52905
■ DECL. NO. SDM/SR/11/2013
■ https://sangharshachaaawaz.in

■ वर्ष : १४ वे ■ अंक : १७ वा ■ सोमवार दि.१६ नोव्हेंबर ते २२ नोव्हेंबर २०२६ ■ किंमत : २ रु. ■ पाने – ०४



गोकुळ दूध संघातील सत्तासंघर्ष... पान २ वर | आदिवासी समाज कृती समिती... पान ३ वर | महाराष्ट्राच्या सहकार चळवळीचा... पान ४ वर


## छटपूजेच्या विरोधावरून भाषिक द्वेष पसरवणाऱ्या उद्धव ठाकरे, राज ठाकरेंवर NSA अंतर्गत कारवाई होणार का? भाजपने खुलासा करावा : ॲड.प्रकाश आंबेडकर

**मुंबई :** मुंबईमध्ये छटपूजेला यापूर्वीही शिवसेनेकडून विरोध करण्यात आला होता. 'छटपूजा मुंबईत का?' असा त्या विरोधाचा सूर होता. आता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनेही छटपूजेला विरोध केला आहे. मात्र, आता या विरोधाची व्याप्ती वाढली असून हा विरोध भाषेच्या आधारावर केला जात आहे. भाषा हीसुद्धा एक प्रकारची सब नॅशनॅलिटी आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. भावनिक मुद्द्यांच्या आधारे भाषेचा प्रश्न उपस्थित केला जात असून



त्यातून भाषिक द्वेषाची भावना निर्माण केली जात आहे.

भाषेच्या आधारावर जगभरात अनेक राज्ये आणि देशांचे विभाजन झाले आहे. त्यामुळे भाषेच्या नावाखाली द्वेषाची ठिणगी पाडणाऱ्यांना मी देशविरोधी मानतो. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्यावर राष्ट्रीय सुरक्षा कायद्यांतर्गत (NSA) कारवाई होणार आहे की नाही, याचा खुलासा भाजपने करावा, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे.

भाजपने उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्यावर कारवाई केली तरच सरकार खरोखर कारवाई करत आहे, असे मी मानेन. मात्र, भाजपने कारवाई केली नाही, तर स्वतःचा राजकीय अजेंडा पुढे नेण्यासाठी या दोन्ही नेत्यांचा वापर केला जात आहे, असे स्पष्ट होईल, असे आंबेडकर म्हणाले.

यावेळी त्यांनी वंचित बहुजन आघाडीने यापूर्वी मांडलेल्या कॉर्पोरेटच्या वर्चस्वाच्या मुद्द्याचाही संदर्भ दिला. देशात ज्या पद्धतीने कॉर्पोरेट व्यवस्था उभी केली जात आहे, त्यातून देशाचे विघटन होण्याची शक्यता असून उद्याचे राज्य हे लोकशाही व्यवस्थेऐवजी कॉर्पोरेटच्या नियंत्रणाखालील राज्य असेल, अशी भूमिका त्यांनी मांडली. भाजप उद्धव ठाकरे आणि (पान ३ वर)

## स्थायी समितीचा ठराव दप्तरी दाखल करण्याबाबत विरोधी पक्षनेते ॲड.निलेश निकम यांनी दिले निवेदन

**पुणे :** स्थायी समितीच्या पूर्वीच्या निर्णयाचा फेरविचार करून स्थायी समितीचा ठराव दफ्तरी दाखल करण्याबाबत विरोधी पक्षनेते ॲड.निलेश निकम यांनी नगरसचिव कार्यालयाला निवेदन दिले.

स्थायी समितीच्या सभेमध्ये यापूर्वी मंजूर करण्यात आलेल्या ठराव क्र.१४५१ त्वर्य, दिनांक ३०/१०/२०२६ अन्वये या विषयास मंजुरी देण्यात आलेली आहे.

एच.सी.एम.टी.आर आणि इनर रिंग रोड या प्रकल्पांच्या भू-संपादनासाठी अपवादात्मक बाब म्हणून कॉसमॉस को-ऑप.बँकेत



रक्कम.रू.५००/- कोटी मुदत ठेव ठेवून त्या ठेवीवर ९५ टक्के (४५० कोटी) कर्ज काढण्याचा निर्णय झालेला आहे. तथापि एस.सी.एम.टी.आर चा विस्तृत प्रकल्प अहवाल अद्याप प्रशासनाने सादर केलेला नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९४ नुसार मागील आर्थिक वर्षाचा (सन २०२५-२६) पुणे महानगरपालिका प्रशासनाने वार्षिक प्रशासन अहवाल आणि लेख विवरणपत्र अद्याप (पान ३ वर)

## पुणे महापालिकेचे १५० कोटी रुपये मुदत ठेवीत गुंतविणार राष्ट्रीयीकृत बँकांना प्राधान्य; स्थायी समितीची प्रस्तावाला मान्यता



**पुणे :** पुणे महापालिकेकडे उपलब्ध असलेला अतिरिक्त निधी सुरक्षित ठेवण्याबरोबरच त्यावर व्याजाच्या माध्यमातून उत्पन्न मिळविण्यासाठी १५० कोटी रुपये मुदत ठेवीमध्ये (एफडी) गुंतविण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. राष्ट्रीयीकृत बँकांसह शासनाने गुंतवणुकीसाठी पात्र ठरविलेल्या बँकांमध्ये रक्कम गुंतविण्याचा प्रस्ताव अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर यांनी स्थायी समितीसमोर सादर केला होता. या प्रस्तावाला मान्यता दिल्याचे समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी सांगितले.

महापालिकेच्या जमा-खर्चाचा आढावा घेतल्यानंतर (पान ३ वर)

## फुले विचार म्हणजे सर्वंकष समतेचा विवेक!

## डॉ.उमेश बगाडे यांचे सत्यशोधक विचार संगीतीत प्रतिपादन

**पुणे :** देशभरात मूलतत्त्ववादी सनातनी शक्तींचा प्रादुर्भाव झाला असल्याने सर्वांगीण चिकित्सेचा पुरस्कार करणारा सत्यशोधक विचार महत्त्वाचा असल्याचे प्रतिपादन सत्यशोधक नेते व अभ्यासक डॉ.अशोक चोपडे (वर्धा) यांनी केले. श्री शिवाजी मराठा सोसायटी पुणे येथे सत्यशोधक प्रबोधन महासभेच्या वतीने महात्मा फुले जन्मद्विशताब्दी निमित्त आयोजित पहिल्या सत्यशोधक विचार संगीतीचे (परिषदेचे) उद्घाटक म्हणून ते बोलत होते. महात्मा फुले रचित सत्याच्या




अखंडाचे सामूहिक गायनाने परिषदेचा प्रारंभ झाला.

महात्मा फुले यांनी धर्मासह सामाजिक सांस्कृतिक समीक्षेद्वारे महाराष्ट्रात आधुनिक समतावादी पायांचा विचारांचा पाया रचला. सार्वजनिक सत्य धर्माद्वारे त्यांनी समाजाला जोडण्याचा विचार केला. आज दुष्काळ,शेती प्रश्नासह नव्या जुन्या समस्यांशी लढताना या विचारांचा संदर्भ महत्त्वाचा असल्याचे डॉ.चोपडे यांनी स्पष्ट केले. सत्यशोधक चळवळीचा अभ्यास करताना विदर्भातील या चळवळीच्या समृद्ध प्रभावाचा मागोवा संशोधकांनी घ्यावा अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

या दोन दिवसीय परिषदेचे बीजभाषण प्रख्यात विचारवंत डॉ.उमेश बगाडे यांनी केले. महात्मा फुले यांनी जातीव्यवस्था अंत, स्त्रीपुरुष समानता आणि मानवी हक्काची सातत्यपूर्ण मागणी केली. अखंड बंधुप्रीती काय केल्याने निर्माण होईल? असा प्रश्न विचारण्याबरोबरच त्याचा म्हणजे सत्याचा शोध घेण्यानेच महात्मा फुलेंच्या विचारांना वैश्विक मूल्य प्राप्त होतं, त्यांचे विचार म्हणजे सर्वंकष समतेचा विवेक असल्याचे मत डॉ.बगाडे यांनी मांडले. ज्ञानाची नवी व्याख्या महात्मा फुलेंनी दिली. व्यक्तिगत अनुभवजन्य ज्ञानाला सार्वत्रिक परिमाण देत प्रस्थापित ज्ञानसत्तेसमोर आव्हान उभे केले. महात्मा फुलेंपासून ते कॉम्रेड शरद पाटलांपर्यंतचे (पान ३ वर)

# संपादकीय...

## गोकुळ दूध संघातील सत्तासंघर्ष आणि रिपोर्टर्स कलेक्टिव्हच्या अहवालामुळे लोकशाहीच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह?

सत्तेसाठी कायद्याचे नियम बदलले जात असतील, निवडणुकीतील जनमताला वेगळ्या मार्गाने निष्प्रभ केले जात असेल आणि सत्ताधाऱ्यांच्या निर्णयांवर प्रश्न उपस्थित करणाऱ्या संस्थांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडत असेल, तर लोकशाही टिकणार कशी?

भारताची लोकशाही ही केवळ निवडणुका घेण्यापुरती मर्यादित नाही. लोकशाहीचा खरा अर्थ म्हणजे जनतेने दिलेल्या कौलाचा सन्मान, कायद्याचे राज्य, स्वतंत्र न्यायव्यवस्था, निर्भीड प्रसारमाध्यमे आणि सत्तेवर नियंत्रण ठेवणाऱ्या घटनात्मक संस्थांची जबाबदारी.

लोकशाहीचे चार प्रमुख स्तंभ म्हणून विधिमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायपालिका आणि प्रसारमाध्यमे यांचा उल्लेख केला जातो. या चारही स्तंभांनी आपापली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडली नाही, तर लोकशाहीची इमारत वरकरणी मजबूत दिसली तरी आतून कमकुवत होण्यास वेळ लागणार नाही.

कोल्हापूरच्या गोकुळ दूध संघाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीभोवती निर्माण झालेला वाद हा केवळ एका सहकारी दूध संघाच्या अध्यक्षपदाचा वाद नाही. तो सहकार क्षेत्रातील लोकशाही, सत्तेचा वापर, कायद्यातील बदल आणि निवडून आलेल्या प्रतिनिधींच्या अधिकारांशी संबंधित गंभीर प्रश्न उपस्थित करणारा प्रकार आहे. त्यातच रिपोर्टर्स कलेक्टिव्हच्या अहवालातून समोर आलेल्या बाबींच्या पार्श्वभूमीवर या संपूर्ण व्यवस्थेची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी होण्याची गरज अधिक प्रकर्षाने जाणवते. या अहवालासाठी महाराष्ट्र, हरियाणा आणि जम्मू-काश्मीरमधील २०२४ च्या विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांशी संबंधित ५३० मतदारसंघांच्या नोंदींचे परीक्षण करण्यात आले. त्यासाठी निवडणूक अधिकाऱ्यांनी तयार केलेल्या ४,२१२ कागदपत्रांची तपासणी करण्यात आल्याचे रिपोर्टर्स कलेक्टिव्हने म्हटले आहे. या तपासणीत ५१ मतदारसंघांमध्ये मतदारांनी प्रत्यक्ष मतदान केल्याची नोंद आणि ईव्हीएममध्ये मोजल्या गेलेल्या मतांची नोंद यांच्यात तफावत किंवा आवश्यक नोंदींचा अभाव आढळल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यातील १९ मतदारसंघांमध्ये मतदान केंद्रावर प्रत्यक्ष आलेल्या मतदारांची संख्या नोंदविण्याऐवजी शून्य किंवा NIL अशी नोंद करण्यात आली होती. महाराष्ट्र आणि हरियाणातील अशा दहा मतदारसंघांपैकी सात मतदारसंघांत भाजप किंवा भाजपप्रणीत आघाडीचे उमेदवार विजयी झाल्याचे अहवालात नमूद आहे. तसेच ३२ मतदारसंघांमध्ये मतदान झालेली मते आणि मोजलेली मते यांच्यात तफावत आढळल्याचे या तपासणीत म्हटले आहे.

महाराष्ट्रातील मुंबई उत्तर लोकसभा मतदारसंघाचे उदाहरण विशेष गंभीर आहे. या अहवालानुसार निवडणूक आयोगाच्या अंतर्गत नोंदींमध्ये १८.११ लाख मते मतदान झाल्याचे नमूद होते, तर आयोगाने घोषित केलेल्या निकालानुसार १०.३३ लाख मते मोजली गेली. म्हणजेच ७.७८ लाख मतांची तफावत दिसून येते.

ही बाब केंद्रीय निवडणूक आयोगाने स्वतंत्रपणे स्पष्ट करणे अत्यंत आवश्यक आहे. मात्र येथे एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. मतांच्या नोंदींमधील तफावत म्हणजे आपोआप मतदानाची चोरी सिद्ध झाली, असे होत नाही. त्यामागे प्रशासकीय चूक, नोंदणीतील त्रुटी किंवा इतर कारणे असू शकतात. परंतु एवढ्या मोठ्या तफावतींचे पारदर्शक स्पष्टीकरण आणि स्वतंत्र चौकशी होणे ही आयोगाची जबाबदारी आहे.

रिपोर्टर्स कलेक्टिव्हने या प्रकरणी निवडणूक आयोगाला प्रश्न पाठवले असता आयोगाने स्वतःचीच माहिती पुन्हा आयोगाकडे पाठवण्यास सांगितल्याचेही अहवालात नमूद आहे.

मग प्रश्न असा आहे की, निवडणूक प्रक्रियेची विश्वासार्हता तपासण्याची जबाबदारी असलेल्या संस्थेच्या नोंदींमध्येच इतक्या मोठ्या त्रुटी आढळत असतील, तर सामान्य नागरिकांनी लोकशाही प्रक्रियेवर विश्वास कसा ठेवायचा?


साप्ताहिक संघर्षाचा आवाज मालक – यशोदा उत्तरेश्वर सोनवणे, यांनी सा. संघर्षाचा आवाज संपादक, मुद्रक, प्रकाशक संजय सोनवणे यांना सर्व अधिकार दिले आहे. त्यांनी श्री साई ग्राफिक्स, डी. एस. के. चिंतामणी कॉम्प्लेक्स. विंग – सी – २, शॉप नं. ३८, शनिवार पेठ, पुणे – ४११०३० येथे छापून सर्व्हे नं. ८, नेताजीनगर, येरवडा, पुणे – ४११००६ येथून प्रकाशित केले.

Yashoda Uttareshwar Sonwane, the owner of Weekly Sangharshacha Aawaz, has given all rights to the Sanjay Uttareshwar Sonwane, editor, printer, publisher of Weekly Sangharshacha Aawaz. This weekly is printed at Shri Sai Graphics, D. S. K. Chintamani Complex, Wing C-2, Shop No. 38, Shaniwar Peth, Pune - 411030 and published at Survey No. 8 Netajinagar, Yerawada, Pune - 411006.

या साप्ताहिकात प्रसिध्द झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

कायदेशीर प्रकरणे पुणे न्यायालयांतर्गत सोडवली जातील अन्यत्र कोठेही नाही.

**आपल्या प्रतिक्रिया येथे नोंदवाव्यात**
Email : sangharshachaaawaz22@gmail.com
Email : sangharshachaaawaz@rediffmail.com
Mob. : 7276871008 / 9665487134



**मागील अंकावरून**

दुसऱ्याचे नुकसान करण्याची इच्छा धरणारे, वाईट मित्र, सोबती ही सहा कारणे मनुष्याच्या सत्यानाशास कारणीभूत ठरतात.

ज्याचे मित्र व सहयोगी, सोबती जर पापानी बरबटले असतील तर तो दोन्ही जगात नष्ट-भ्रष्ट होईल. या लोकात व परलोकात देखील जुगार, परनारीगमन, दारू, नाच, गाणे, दिवसभर झोप. अनेक गल्ली बोळांत फिरणे, वाईटाची संगत, परकोटीचा लोभ अशा एकूण नऊ कारणांनी मनुष्य बरबाद होतो. नेस्तनाबूत होतो.

जो जुगार खेळतो, जो नशापाणी करतो, परस्त्रीशी अनैतिक संबंध ठेवतो. जो नीच लोकांची संगत करतो, ज्ञानी लोकांची संगत करित नाही, त्यांचा सहवास टाळतो त्याची अधोगती होते. जशी कृष्ण पक्षातील चंद्राची कला. **क्रमश:**

# सिगोलवाद सुत्त

मला उपलब्ध वाङमयाद्वारे धर्मासंबंधी जे ज्ञान प्राप्त झाले. त्याचे सर्वासाठी विवरण करावे असे वाटले आणि धम्मप्रचाराच्या कामास सुरूवात करावी असे वाटले. विचार मनाना भावला लिखाणाचे अंग नोकरीत असल्यापासून आहे, धम्मासंबंधी मला पटलेल्या लहान विषयावर आधारित बाबी पुस्तकरूपाने समाजास देणे ही योजना आहे. भगवंताच्या सुत्तातील अर्थ मला समजला तसा मी मांडला आहे, अर्थात माझ्या आचरणाला धर्म मी सांगतोय. मला लेखक व्हायचे नाही. धम्माच्या आचरणाद्वारा प्रचार करावयाचा आहे. त्यासाठी माझ्या बुध्दीनुसार, आकलनानुसार मी प्रयत्न करण्याचे धाडस केले आहे व ते पुढेही चालू ठेवणार आहे. प्रोत्साहन मिळाल्यास माझाही हुरूप वाढेल व पुढील काम विनाविलंबाने करीन.

जयभीम!

**उत्तमराव सोनवणे**

# बिरसा मुंडा : आदिवासी अस्मिता व स्वातंत्र्यलढ्याचा नायक – डॉ. राजेंद्र बगाटे

भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास हा विविध समाजघटकांच्या त्याग, संघर्ष आणि बलिदानाने समृद्ध झालेला आहे. ब्रिटिश सत्तेविरुद्ध देशाच्या कानाकोपऱ्यात अनेक क्रांतिकारकांनी संघर्ष केला. या संघर्षामध्ये आदिवासी समाजाचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. जल, जंगल आणि जमिनीवरील पारंपरिक अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी, ब्रिटिशांच्या अन्यायकारक धोरणांविरुद्ध आवाज उठवण्यासाठी आणि आपल्या सामाजिक-सांस्कृतिक अस्मितेचे रक्षण करण्यासाठी आदिवासी समाजाने अनेक आंदोलने उभारली. या संघर्षाला व्यापक दिशा देणाऱ्या महान क्रांतिकारकांमध्ये भगवान बिरसा मुंडा यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. त्यांनी अत्यंत अल्पायुष्यात आदिवासी समाजामध्ये स्वाभिमान, सामाजिक जागृती, संघटनशक्ती आणि स्वातंत्र्याची भावना निर्माण केली. ब्रिटिश सत्तेविरुद्ध त्यांनी उभारलेला 'उलगुलान' अर्थात महाउठाव हा भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील आदिवासी प्रतिकाराचा एक महत्त्वपूर्ण अध्याय आहे. बिरसा मुंडा यांचे जीवन म्हणजे अन्यायाविरुद्धचा संघर्ष, सांस्कृतिक अस्मितेचे संरक्षण आणि सामाजिक परिवर्तनासाठी केलेल्या अविरत प्रयत्नांची प्रेरणादायी गाथा आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचे स्मरण करणे म्हणजे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील आदिवासी समाजाच्या योगदानाचा सन्मान करणे होय.



डॉ.राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्र, पाली व बौद्ध साहित्याचे अभ्यासक आहेत)
ईमेल – bagate.rajendra5gmail.com

बिरसा मुंडा यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी तत्कालीन बंगाल प्रांतातील छोटानागपूर परिसरातील उलिहातू या गावात झाला. हे गाव आजच्या झारखंड राज्यातील खुंटी जिल्ह्यात आहे. त्यांचा जन्म मुंडा या आदिवासी समाजात झाला. त्यांचे बालपण अत्यंत साध्या आणि प्रतिकूल परिस्थितीत गेले. आदिवासी समाजाचे जीवन जंगल, जमीन, शेती, निसर्ग आणि सामुदायिक परंपरांशी घट्ट जोडलेले होते. निसर्गाच्या सान्निध्यात वाढलेल्या बिरसा मुंडा यांनी लहानपणापासूनच आपल्या समाजाच्या जीवनातील अडचणी, गरिबी, शोषण आणि अन्याय जवळून अनुभवला. आदिवासी समाजाच्या जीवनपद्धतीमध्ये सामूहिकता, परस्पर सहकार्य, निसर्गाविषयी आदर आणि सांस्कृतिक स्वायत्तता यांना विशेष महत्त्व होते. मात्र ब्रिटिश राजवटीच्या विस्तारानंतर या जीवनपद्धतीवर अनेक संकटे निर्माण झाली. जंगलांवरील निर्बंध, जमिनीच्या मालकीसंबंधी बदललेले नियम, सावकारांचे शोषण आणि बाहेरून आलेल्या जमीनदारांच्या हस्तक्षेपामुळे आदिवासी समाजाचे पारंपरिक अधिकार धोक्यात आले. या परिस्थितीने बिरसा मुंडा यांच्या मनात अन्यायाविरुद्ध संघर्ष करण्याची प्रेरणा निर्माण केली.

बिरसा मुंडा यांचे बालपण आणि शिक्षण यांचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीवर महत्त्वपूर्ण परिणाम झाला. त्यांनी स्थानिक पातळीवर प्राथमिक शिक्षण घेतले. पुढील शिक्षणासाठी त्यांचा काही काळ चाईबासा परिसराशी संबंध आला. शिक्षणाच्या माध्यमातून त्यांना तत्कालीन सामाजिक आणि राजकीय परिस्थितीचे आकलन होण्यास मदत झाली. ब्रिटिश प्रशासन, जमीनदार, सावकार आणि मिशनरी संस्थांच्या प्रभावामुळे आदिवासी समाजात होत असलेल्या बदलांचे त्यांनी निरीक्षण केले. आदिवासी समाजाच्या पारंपरिक जीवनपद्धतीवर होणारे आघात आणि त्यातून निर्माण होणारी अस्वस्थता त्यांच्या लक्षात आली. शिक्षणामुळे त्यांच्यात प्रश्न विचारण्याची वृत्ती विकसित झाली. समाजातील शोषणाची कारणे समजून घेऊन त्याविरुद्ध संघटित प्रयत्न करण्याची आवश्यकता त्यांनी ओळखली. त्यामुळे त्यांचे कार्य केवळ राजकीय विरोधापुरते मर्यादित राहिले नाही, तर सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाच्या दिशेनेही विस्तारले.

ब्रिटिश राजवटीने छोटानागपूर प्रदेशातील पारंपरिक जमीनव्यवस्थेमध्ये हस्तक्षेप केल्यामुळे मुंडा समाजाच्या जीवनावर गंभीर परिणाम झाला. मुंडा समाजात प्रचलित असलेली 'खुंटकट्टी' ही पारंपरिक सामुदायिक जमीनव्यवस्था त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनाचा आधार होती. या व्यवस्थेमध्ये एखाद्या वंशाने किंवा कुटुंबसमूहाने जंगल साफ करून शेतीयोग्य केलेल्या जमिनीवर त्यांचे पारंपरिक सामुदायिक अधिकार मान्य केले जात असत. ब्रिटिश प्रशासनाने महसूलवसुली आणि जमीनमालकीच्या नव्या पद्धती लागू केल्यामुळे या व्यवस्थेला धक्का बसला. बाहेरून आलेले जमीनदार, सावकार, कंत्राटदार आणि व्यापारी यांना आदिवासी समाजात 'दिकू' म्हणून संबोधले जात असे. या बाह्य घटकांच्या हस्तक्षेपामुळे आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनी हळूहळू त्यांच्या हातातून जाऊ लागल्या. कर्जबाजारीपणा, अवाजवी महसूल, वेठबिगारी आणि आर्थिक शोषण यांमुळे आदिवासींचे जीवन अधिकच असुरक्षित बनले. स्वतःच्या जमिनीवर शेती करूनही त्यांना त्या जमिनीवरील अधिकार गमवावे लागत होते. या अन्यायकारक परिस्थितीविरुद्ध बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजाला संघटित करण्याचा प्रयत्न केला.

बिरसा मुंडा यांच्या कार्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी सामाजिक आणि धार्मिक जागृतीला संघर्षाचा आधार बनवले. त्यांच्या मते, समाजाची प्रगती साधण्यासाठी केवळ बाह्य शोषणाविरुद्ध लढणे पुरेसे नव्हते, तर समाजातील अंतर्गत कमतरताही दूर करणे आवश्यक होते. त्यांनी आदिवासी समाजाला अंधश्रद्धा, अनिष्ट प्रथा, व्यसनाधीनता आणि परस्परांमधील मतभेदांपासून दूर राहण्याचे आवाहन केले. स्वच्छता, नैतिक आचरण, एकता, आत्मसन्मान आणि सामूहिक जबाबदारी यांचे महत्त्व त्यांनी लोकांना पटवून दिले. आपल्या पारंपरिक संस्कृतीचा अभिमान बाळगावा आणि तिचे जतन करावे, असा संदेश त्यांनी दिला. त्यांच्या नेतृत्वाखाली उदयास आलेल्या धार्मिक-सामाजिक चळवळीला 'बिरसाइत' चळवळ म्हणून ओळखले जाते. या चळवळीमुळे मुंडा समाजात नव्या आत्मविश्वासाची निर्मिती झाली. समाजातील प्रत्येक व्यक्तीने स्वतःच्या हक्कांविषयी जागरूक असावे

# आदिवासी समाज कृती समिती महाराष्ट्र, पुणे आणि न्यू आदिम आनंद यात्री ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने कातकरी बांधवांना दिवाळी फराळाचे वाटप





**महाराष्ट्रात कातकरी, कोलाम आणि माडिया गोंड या आदिम जमाती असून सुद्धा त्यांना अद्यापही प्राथमिक शिक्षण, आरोग्य, निवारा आणि निवासासाठी जागा व घरे उपलब्ध नाहीत हि दुर्दैवाची बाब आहे. सरकारी योजना व घोषणा त्यांच्या कानांवर जात नाहीत. हा समुदाय जो पर्यंत वरील प्राथमिक गरजा पूर्ण करू शकणार नाही तो पर्यंत विकसित भारत -२०४७ च्या घोषणेला काहीच अर्थ उरणार नाही. - अध्यक्ष नामदेव गंभिरे**

**पुणे/भोर :** पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील चेलाडी, कासुर्डी, वडगाव डाळ आदी सुमारे ३०० कुटुंबांना दिवाळी निमित्त सुमारे ३०० ज्ञस लाडूचे वाटप करण्यात आले. या विभागात दिवाळी फराळ वाटपाचे हे १३ वे वर्ष आहे. केवळ दिवाळी निमित्त फराळ वाटप करणे हा एकमेव उद्देश्य नसून कातकरी समाजाचे शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि निवास ह्या बाबींचा समावेश आहे. महाराष्ट्रात कातकरी, कोलाम आणि माडिया गोंड या आदिम जमाती असून सुद्धा त्यांना अद्यापही प्राथमिक शिक्षण, आरोग्य, निवारा आणि निवासासाठी जागा व घरे उपलब्ध नाहीत हि दुर्दैवाची बाब आहे. सरकारी योजना व घोषणा त्यांच्या कानांवर जात नाहीत. हा समुदाय जो पर्यंत वरील प्राथमिक गरजा पूर्ण करू शकणार नाही तो पर्यंत विकसित भारत -२०४७ च्या घोषणेला काहीच अर्थ उरणार नाही. चेलाडी, कासुर्डी, वडगाव डाळ, टिटेघर, माकोशी, आंबवडे, नाझरे, करंजे, नाटंबी, भट्टी, शिरवली, पिराचा माळ आदी कातकरी वस्त्यांवरील ६०% लोकांना अद्यापही स्वतःच्या मालकीचे घर, जागा, शेती उपलब्ध नसून शिक्षण, आरोग्य आणि इतर भौतिक सुविधा कोसो दूर आहेत.

या वस्त्या प्रामुख्याने नदीच्या किनारी, ओढ्याच्या कडेला अथवा धरण क्षेत्राच्या परिसरात स्थिरावल्या आहेत. त्यांचे प्रमुख उदर निर्वाहाचे साधन मासेमारी आहे. मासेमारीचे ठेके यांना मिळत नाहीत, त्यामुळे हे लोक त्यांच्याकडे मजुरीवर काम करत आहेत. या व्यतिरिक्त शेतीवर, वीटभट्टीवर मजुरी करून जीवन जगत आहेत. शिक्षणाचं प्रमाण नाहीच. जे कुणी ८ वि ते १० वि पर्यंत शिकले आहेत, तेही अल्प वयात लग्न करून बसले आहेत. दारूचे व्यसन पाचवीला पुजले आहे. अशा परिस्थितीमधे विकास साधने दुराप्रस्त आहे. वरील वस्त्यांपैकी वडगाव डाळ आणि करंजे येथील वस्त्यांचा सुमारे ४० % विकास झाल्याचे दिसून येत आहे. याचे महत्वाचे कारण म्हणजे प्राथमिक शिक्षण, रोजगार, संघटन, स्थानिक संस्था तशेच प्रकल्प अधिकारी, घोडेगांव आणि आदिवासी समाज कृती समिती, पुणे यांचा पुढाकार आहे. या ठिकाणी २५-३० घरकुलांचे सुंदर असे काम झाले असून अंतर्गत रस्ते आणि कातकरी कुटुंबांचे एकंदरीत मत परिवर्तन होऊन विकासाच्या वाटेवर आरूढ झाल्याचे दिसून येत आहे. धर वस्तीचा महाराष्ट्रातील इतर कातकरी समुदायाने विचार करावा असे आम्हांस वाटते.

पुढील वर्षात चेलाडी आणि कासुर्डी या वस्त्यांचा विकास करण्याचे आमचे प्रयत्न आहेत. या वर्षी दुष्काळ असल्याने नद्या, ओढ्यास पाणी नाही, धरणात पाणी कमी आहे, त्यामुळे कातकरी समाजांस या वर्षी मजुरीचे कोणतेही साधन नाही. अनेकांना रेशन कार्ड नाहीत, सबब रेशनही मिळणार नाही, अनेक कुटुंबांनी सावकार, बँक यांचेकडून छोटी कर्जे काढली आहेत, त्यास किमान वसुलीबाबत मुदतवाढ मिळणे आवश्यक आहे. अशा परिस्थीती मध्ये स्थानिक प्रशासन आणि प्रकल्प कार्यालयाने या समुदायाचा या वर्षीचा दुष्काळ सुसह्य कसा होईल या बद्दल आवश्यक ती उपाय योजना करणेत यावी अशी मागणी आम्ही करत आहेत.

या दिवाळीच्या मुहूर्त्वावर कातकरी बांधवांना फराळ वाटप कार्यक्रमासाठी वरील दोन्ही संस्थांचे पदाधिकारी नामदेव गंभिरे, किसन भोजने, चिंतामण भुरकुंडे, खेवजी भोईर, गंगाराम सांगडे, लक्ष्मण भालेकर, सुदाम चपटे, राजेंद्र रेंगडे, बाळासाहेब रेंगडे, बबन कोकाटे, सुभाष मते, संजय केदारी, ज्ञानेश्वर बुरुड, पांडुरंग भालिंगे, सुभाष भवारी, धुंदा मोरे, दिनकर शैलकदें, गंगाराम शेखरें, गोविंद जंगले, धुंदाजी किरवे, गोविंद झंजारे, विलास नवाळी, धनंजय रावते आणि शांताराम शिंगाडे सौ.अशा शेखरें, कृष्णा भालचीम, रंगनाथ डगळे, प्रशांत शिंगाडे, सतीश लेंभे, प्रदीप आंबवणे यांच्या सहकार्याने हा गोड कार्यक्रम उत्साहात पार पडला आहे.

## स्थायी समितीचा ठराव दप्तरी दाखल करण्याबाबत विरोधी पक्षनेते...

**(पान १ वरून)** मा.स्थायी समिती पुढे सादर केलेले नाही. आकाश चिन्ह परवाना फी वसूल करण्याबाबत सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी, तसेच नवीन आकाशचिन्ह परवाने फी किमान रक्कम. रूपये ७५० प्रति, चौरस.फुट आकारणेबाबत, अद्याप प्रशासनाने प्रस्ताव सादर केलेला नाही. त्यामुळे महानगरपालिकेला मिळणारे उत्पन्न बुडत आहे. शासनाकडून मुद्रांक शुल्क व इतर शुल्कापोटी तब्बल ८७३ कोटी रूपये येणे आहे. याबाबत प्रशासनाने तातडीने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

समाविष्ट ३२ गावांमधील मिळकत कर वसुली बाबतचे धोरणाबाबत माननीय मुख्य सभेने ठराव करूनही प्रशासनाने अद्याप निर्णय घेतलेला नाही. मिळकत कराच्या कक्षेबाहेर असलेल्या जवळपास १३० कोटी जमा होऊ शकणारी आकारणी अद्याप केलेली नाही. एच.सी.एम.टी.आर मिसिंग लींक, बॉटल नेक्स, इनर रिंग रोड, डी.पी.मधील अत्यावश्यक रस्ते या सर्व प्रकल्पांसाठी भू-संपादन कामी एकूण किती तरतूद अपेक्षित आहे, याचा एकत्रित प्रस्ताव सादर करण्यात यावा.

तसेच महानगरपालिकेचे आर्थिक परिस्थिती बिकट असल्यास व भूसंपादनासाठी ५०० कोटींची मुदत ठेव कॉसमॉस को-ऑप.बँकेत ठेवण्याऐवजी इतर सर्व बँकांकडून एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट मागून जास्तीत जास्त व्याजदर देणाऱ्या बँकेत ठेवणे संयुक्तीक व कायदेशीर राहील. वस्तुस्थिती विचारात घेता, पूर्वीच्या निर्णयाचा फेरविचार करून प्रस्ताव दफ्तरी दाखल करण्यात यावा. असे ॲड.निलेश निकम यांनी निवेदनात म्हटले आहे.

## छटपूजेच्या विरोधावरून भाषिक द्वेष...

**(पान १ वरून)** राज ठाकरे यांच्यावर कारवाई करत नसेल, तर कॉर्पोरेटचे वर्चस्व निर्माण करण्याच्या मोठ्या राजकीय योजनेचा हा एक भाग आहे, असे मला वाटते. राज्याच्या जागी कॉर्पोरेटचे जग उभे करण्याचा भाजपचा डाव पुढे नेण्यासाठी या दोन्ही नेत्यांचा वापर केला जात आहे, असेही आंबेडकर यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, या संपूर्ण राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे यांनी सावध राहावे, असा इशाराही ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी दिला.

## फुले विचार म्हणजे सर्वंकष समतेचा...

**(पान १ वरून)** लोकशाही क्रांतीचे चर्चाविश्व विकसित करणे हेच जाती आधारित विषमतेला उत्तर असल्याचे डॉ.बगाडे यांनी बीजभाषणात स्पष्ट केले. आज शिक्षण व अभ्यासक्रमातील विषमतेपासून संविधानिक लोकशाही अधिकार काढून घेणाऱ्या मनुवादी फॅसिजमचा अनुभव सामान्य जनता घेत आहे. कष्टकऱ्यांमध्ये जातीअंताऐवजी जातीयुद्ध भडकले आहे आणि स्त्री पुरुष विषमता शिगेला पोचली आहे म्हणूनच तंत्रवैज्ञानिक क्रांतीनंतर नवे स्वरूप धारण करणाऱ्या विषमतेचा प्रतिकार करण्यासाठी म.फुले प्रणित समतावाद जोपासण्यासाठी सत्यशोधक विचार संगीतीचे आयोजन महत्त्वाचे असल्याचे मत अध्यक्ष स्थानावरून बोलताना किशोर ढमाले यांनी नमूद केले.

परिषदेस महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग चंद्रपूर ते नंदुरबार इत्यादी ११ जिल्ह्यातील २०० प्रतिनिधींसह श्री शिवाजी मराठा सोसायटीचे पदाधिकारी श्री.जगदीश जेधे एड. एन.डी.पाटील, निवृत्त अति. आयुक्त ज्ञानेश्वर मोळक, पत्रकार अरुण खोरे, प्रा.प्रतिमा परदेशी, कमल पायगुडे इ. मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. डॉ.विलास बुवा तर आभार प्रदर्शन राजेंद्र शेलार यांनी केले. विचार संगीतीच्या पहिल्या दिवशी जातीव्यवस्थेचे सार्वत्रिक वर्तमान या विषयावरील सत्रात डॉ. मुफीद मुजावर (कोल्हापूर) आणि डॉ.निळकंठ शेरे, अलिबाग यांनी जाती व्यवस्था आणि मुस्लिम समाज व फुले आंबेडकरांचे ब्राह्मणीकरण या संदर्भात मांडणी केली. सत्राचे अध्यक्षपद मुंबई विद्यापीठाचे माजी मराठी विभाग प्रमुख डॉ. अनिल सपकाळ यांनी भूषवले तर सूत्रसंचालन अशपाक कुरेशी (धुळे) यांनी केले.

फुले आंबेडकरी साहित्य आणि सांस्कृतिक राजकारण या तिसऱ्या सत्रात डॉ.संजय कुमार कांबळे (पुणे) व प्रा.भगवान फाळके (अमरावती)यांनी दिवंगत दिनकर साळवे यांच्या पुस्तकांच्या आधारे दलित साहित्य व आंबेडकरोत्तर राजकारण यांच्याविषयी चर्चा केली. अध्यक्षस्थानी मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.वंदना महाजन होत्या. डॉ. अप्पाराव चव्हाण यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. चौथे सत्र सांस्कृतिक परिवर्तन व सद्य राजकीय स्थिती संदर्भात बी युवराज (पुणे) यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. या सत्रात मुक्ता साळवे फातिमा शेख: प्रतीके आणि समकालीन सांस्कृतिक राजकारण याबद्दल उदगीरचे डॉ.मारुती कसाब यांनी तर राजकीय अवनत काळाचा अंतर्वेध या सचिन गरुड (सांगली) लिखित ग्रंथाच्या आधारे दीपक कसाळे(पुणे)यांनी मांडणी केली. वामन वळवी यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. पाचव्या सत्रात स्त्रीमुक्ती काल आणि आज याविषयी मनुस्मृती स्त्रिया आणि डॉक्टर आंबेडकर या दिवंगत सरोज कांबळे व प्रा.प्रतिमा परदेशी लिखित पुस्तकांच्या आधारे प्राध्यापक अश्विनी आडे व लक्ष्मी यादव (मुंबई)यांनी प्रा. डॉ.संगीता ठोसर (मुंबई) यांच्या अध्यक्षतेखाली मांडणी केली.

## पुणे महापालिकेचे १५० कोटी रुपये मुदत ठेवीत...

**(पान १ वरून)** उपलब्ध निधीपैकी १५० कोटी रुपये गुंतवणुकीसाठी उपलब्ध असल्याचे प्रशासनाच्या प्रस्तावात नमूद करण्यात आले आहे. ही गुंतवणूक १२ महिने (३६५ किंवा ३६६ दिवस), सहा महिने (१८० किंवा १८१ दिवस) अथवा त्यापेक्षा कमी-जास्त कालावधीसाठी करण्याचे नियोजन आहे. त्यानुसार बँकांकडून मिळणारे व्याजदर आणि गुंतवणुकीचा कालावधी विचारात घेऊन निर्णय घेतला जाणार आहे.

महापालिकेच्या स्थायी समितीने यापूर्वी २१ एप्रिल १९८९ रोजीच्या ठरावानुसार गुंतवणुकीच्या धोरणाला मान्यता दिली होती. त्यानुसार ७० टक्के गुंतवणूक आणि ३० टक्के लाभांशासंदर्भातील धोरण निश्चित करण्यात आले होते. याशिवाय २००७, २०१८ आणि २०२१ मधील स्थायी समितीच्या ठरावांचाही संदर्भ प्रशासनाने दिला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ९२ नुसार महापालिकेला उपलब्ध निधीची गुंतवणूक करण्याचे अधिकार आहेत. त्यानुसार राज्य शासन, सरकारी उपक्रम, सार्वजनिक वित्तीय संस्था तसेच पात्र बँकांच्या ठेवी आणि सरकारी कर्जरोख्यांमध्ये गुंतवणूक करता येते. शासनाच्या वित्त विभागाने २२ नोव्हेंबर २०२३ रोजी काढलेल्या निर्णयानुसार ठरावीक आर्थिक निकष पूर्ण करणाऱ्या राष्ट्रीयीकृत बँकांना गुंतवणुकीसाठी पात्र ठरविण्यात आले आहे. नगरविकास विभागाने २०२४ मध्ये काढलेल्या शासन निर्णयांनुसारही या गुंतवणुकीला मान्यता देण्यात आली आहे.

# महाराष्ट्राच्या सहकार चळवळीचा वारसा देशभर पोहोचविण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील - केंद्रीय गृहमंत्री अमित शाह

## पुण्यात सहकार मंत्रालयाचे पश्चिम विभागीय कार्यालय सुरू

**पुणे :** महाराष्ट्राच्या सहकार चळवळीचा समृद्ध वारसा देशभर पोहोचविण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील असून, देशाच्या पश्चिम विभागातील सहकारी संस्थांना मार्गदर्शन व सहकार्य करण्यासाठी पुण्यात सहकार मंत्रालयाचे पश्चिम विभागीय कार्यालय सुरू करण्यात येत आहे. तळेगाव येथील बंद पडलेली नॅशनल हेवी इंजिनिअरिंग को-ऑपरेटिव्ह लिमिटेड ही बहुराज्य सहकारी संस्था दीड हजार कोटी रुपयांच्या वित्तीय सहाय्याने पुन्हा कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्याचबरोबर सहकारी तत्त्वावर आधारित आणि कमिशनविरहित 'भारत टॅक्सी' सेवेमुळे टॅक्सीचालकांना केवळ चालक न राहता स्वतःच्या सेवेचे मालक होण्याची संधी मिळणार आहे, असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री तथा सहकार मंत्री अमित शाह यांनी केले.

तळेगाव येथे नॅशनल हेवी इंजिनिअरिंग को-ऑपरेटिव्ह लिमिटेड या बहुराज्य सहकारी संस्थेच्या पुनरुज्जीवन प्रकल्पाचे भूमिपूजन, पुण्यात सहकारी संस्थांचे केंद्रीय निबंधक (सीआरसीएस) यांच्या पश्चिम विभागीय कार्यालयाचे दूरदृश्य प्रणालीद्वारे उद्घाटन आणि पुण्यासाठी 'भारत टॅक्सी' सेवेच्या प्रारंभप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, केंद्रीय सहकार राज्यमंत्री कृष्णपाल गुर्जर, केंद्रीय नागरी विमान वाहतूक व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, खासदार श्रीरंग बारणे, आमदार सुनील शेळके, माजी आमदार संजय (बाळा) भेगडे तसेच केंद्रीय सहकार सचिव आशिषकुमार भुटानी उपस्थित होते.

### नॅशनल हेवी इंजिनिअरिंग संस्थेच्या पुनरुज्जीवनातून सहकाराला औद्योगिक बळ

केंद्रीय गृहमंत्री श्री. शाह म्हणाले, तळेगाव येथील बंद पडलेली नॅशनल हेवी इंजिनिअरिंग को-ऑपरेटिव्ह लिमिटेड ही महत्त्वाची बहुराज्य सहकारी संस्था पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या संस्थेच्या पुनरुज्जीवनासाठी दीड हजार कोटी रुपयांचे वित्तीय सहाय्य आयडीएमसी आणि इतर वित्तीय संस्थाकडून उपलब्ध करून देण्यात येणार असून, या प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यानंतर डिसेंबर २०२७ मध्ये उत्पादन सुरू होईल. सहकाराच्या माध्यमातून औद्योगिक व आर्थिक उपक्रमांना चालना देण्याच्यादृष्टीने हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

या संस्थेमध्ये सहकारी साखर कारखाने, इथेनॉल प्रकल्प आणि दूध डेअरी यांना आवश्यक असणारी यंत्रसामग्री तयार केली जाणार आहे. त्यामुळे सहकारी संस्थांना लागणारी यंत्रसामग्री देशातच उपलब्ध होण्यास मदत होईल. सहकार क्षेत्राची औद्योगिक क्षमता वाढण्याबरोबरच रोजगाराच्या




नव्या संधी निर्माण होतील. सहकारी संस्थांनी केवळ पारंपरिक व्यवसायांपुरते मर्यादित न राहता औद्योगिक उत्पादन क्षेत्रातही पुढाकार घ्यावा, या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले.

### पश्चिम विभागीय कार्यालयामुळे सहकारी संस्थांना प्रशासकीय सेवा सुलभ

पुण्यात सुरू करण्यात आलेल्या सहकारी संस्थांच्या केंद्रीय निबंधकांच्या पश्चिम विभागीय कार्यालयाबाबत बोलताना श्री. शाह म्हणाले, बहुराज्य सहकारी संस्थांना त्यांच्या कार्यक्षेत्रातच प्रशासकीय व नियामक सेवा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हे कार्यालय महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या कार्यालयामुळे सहकारी संस्थांच्या नोंदणीसह विविध प्रशासकीय कामकाजात सुलभता येईल. संस्थांच्या कामकाजातील पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि कार्यक्षमता वाढण्यास मदत होईल. सहकारी संस्थांना त्यांच्या अडचणींसाठी दूरवर जावे लागणार नाही, तर पश्चिम विभागातील संस्थांना स्थानिक पातळीवरच आवश्यक मार्गदर्शन आणि सेवा मिळू शकतील.

महाराष्ट्राच्या भूमीत विठ्ठलराव विखे पाटील, वैकुंठभाई मेहता यांच्यासारख्या सहकारमहर्षींनी सहकाराची मुहूर्तमेढ रोवून ही चळवळ रुजविली. महाराष्ट्राला सहकार क्षेत्राची मोठी परंपरा लाभली आहे. या परंपरेचा उपयोग देशातील सहकारी चळवळ अधिक सक्षम करण्यासाठी होणे आवश्यक आहे. पुण्यातील हे कार्यालय त्या दिशेने महत्त्वाचे पाऊल ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### 'भारत टॅक्सी'मुळे सारथीच होणार सेवेचा मालक

'भारत टॅक्सी' सेवेच्या प्रारंभाबाबत श्री. शाह म्हणाले, सहकाराच्या तत्त्वावर आधारित परिवहन सेवा विकसित करण्याच्यादृष्टीने हा उपक्रम महत्त्वाचा आहे. या सेवेत टॅक्सीचालक म्हणजेच सारथी यांचा सहभाग, मालकी हक्क आणि आर्थिक भागीदारी यांना प्राधान्य देण्यात आले आहे. पारंपरिक टॅक्सी सेवांमध्ये चालकांना मिळणाऱ्या उत्पन्नातून विविध प्रकारचे कमिशन द्यावे लागते. मात्र, सहकारी तत्त्वावर आधारित भारत टॅक्सीच्या माध्यमातून सारथींना त्यांच्या सेवेवर मालकी हक्क मिळविण्याची संधी उपलब्ध होणार आहे. या व्यवस्थेमुळे चालकांना आर्थिक लाभ मिळण्याबरोबरच प्रवाशांनाही वाजवी दरात सेवा उपलब्ध होण्यास मदत होईल. सहकारी व्यवस्थेत सदस्यांचा प्रत्यक्ष सहभाग आणि मालकीची भावना दृढ करण्याच्यादृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी सांगितले.

### सहकार क्षेत्राला केंद्र सरकारकडून मोठे पाठबळ - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, केंद्र सरकारने सहकार क्षेत्राच्या विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांवरील गेल्या अनेक वर्षांपासूनचा सुमारे दहा हजार कोटी रुपयांचा कर माफ करण्यात आला. या निर्णयामुळे राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला असून, त्यांना पुन्हा उभारी घेण्यास मदत झाली आहे.

तळेगाव येथील नॅशनल हेवी इंजिनिअरिंग सहकारी संस्थेच्या पुनरुज्जीवन प्रकल्पामुळे राज्यातील सहकारी साखर कारखाने आणि दूध डेअरी यांना आवश्यक असणारी यंत्रसामग्री देशातच तयार होणार आहे. त्यामुळे सहकार क्षेत्राला स्वदेशी उत्पादनाचे बळ मिळेल. पुण्यात सहकारी संस्थांचे केंद्रीय निबंधक कार्यालय सुरू झाल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

'भारत टॅक्सी'च्या माध्यमातून सारथी स्वतःच मालक होणार असून, प्रवाशांना अत्यंत वाजवी दरात सेवा उपलब्ध होईल. सहकाराच्या माध्यमातून सर्वसामान्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वाचा असल्याचे श्री. शिंदे यांनी सांगितले.

### सहकारातील महत्त्वाची संस्था पुन्हा सुरू होणे ही आनंदाची बाब - उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या, तळेगाव येथील नॅशनल हेवी इंजिनिअरिंग को-ऑपरेटिव्ह लिमिटेडसारखी महत्त्वाची सहकारी संस्था पुनरुज्जीवित होत आहे, ही आनंदाची बाब आहे. या प्रकल्पामुळे शेकडो लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील आणि राज्यातील सहकार क्षेत्राला औद्योगिक बळ मिळेल.

राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना करमाफी देण्याचा तसेच मळीवरील कर कमी करण्याचा निर्णय सहकार क्षेत्रासाठी दिलासादायक ठरला आहे. या निर्णयांमुळे सहकारी संस्थांना नवसंजीवनी मिळाली आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सहकार क्षेत्रातील योगदान महत्त्वपूर्ण होते. सहकार चळवळीच्या बळकटीकरणासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. महाराष्ट्रातील सहकार क्षेत्राला केंद्र सरकारकडून मिळत असलेल्या सहकार्यामुळे या क्षेत्राला निश्चितच नवी दिशा मिळेल, असे त्यांनी सांगितले. पुण्यात 'भारत टॅक्सी' सेवा सुरू होत असल्याबद्दलही त्यांनी आनंद व्यक्त केला.

### पुण्यातील केंद्रीय निबंधक कार्यालयामुळे सहकार क्षेत्राला नवी दिशा - केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ

केंद्रीय नागरी विमान वाहतूक व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी देशातील तसेच महाराष्ट्रातील सहकार क्षेत्राचे महत्त्व अधोरेखित केले. सहकारी संस्थांचे केंद्रीय निबंधक (सीआरसीएस) यांचे देशातील पहिले पश्चिम विभागीय कार्यालय पुण्यात सुरू होत असल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. या कार्यालयामुळे महाराष्ट्रासह पश्चिम विभागातील बहुराज्य सहकारी संस्थांना प्रशासकीय कामकाजासाठी मोठी मदत होणार आहे. सहकारी संस्थांचे कामकाज अधिक सुलभ व सक्षम होण्यासोबतच सहकार क्षेत्राच्या विस्ताराला चालना मिळेल. यामुळे राज्यातील सहकार क्षेत्रासाठी अधिक समृद्धीचे दिवस येतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

तळेगाव येथील नॅशनल हेवी इंजिनिअरिंग को-ऑपरेटिव्ह लिमिटेड या संस्थेच्या पुनरुज्जीवनाचे महत्त्व विशद करताना त्यांनी या प्रकल्पामुळे सहकारी साखर कारखाने, दूध डेअरी आणि इतर सहकारी संस्थांना आवश्यक यंत्रसामग्री उपलब्ध होण्यास मदत होणार असल्याचे सांगितले.

### एनएचईसी आणि आयडीएमसीमध्ये सामंजस्यासाठी आशयपत्राची देवाणघेवाण

या कार्यक्रमात नॅशनल हेवी इंजिनिअरिंग को-ऑपरेटिव्ह लिमिटेड (एनएचईसी) आणि आयडीएमसी लिमिटेड यांच्यात सामंजस्याच्यादृष्टीने आशयपत्राची देवाणघेवाण करण्यात आली. तसेच 'भारत टॅक्सी'च्या वतीने अशोककुमार मिश्रा, सुवर्णा सोनवणे, राजीव सुतार आणि दीपक विश्वकर्मा या चार सारथींना प्रतिनिधिक स्वरूपात समभाग प्रमाणपत्रांचे वितरण केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते करण्यात आले.

# भारतीय संविधान सन्मान परीषदेकडून एक दिवा ज्ञानाचा

**पुणे :** भारतीय संविधान सन्मान परीषद, महाराष्ट्र राज्यचेवतीने दीपावली पाडव्यानिमित्त देशातील पहिली मुलींची शाळा ज्या ठिकाणी महात्मा ज्योतिराव फुले यांनी सुरू केली त्या ऐतिहासिक भिडे वाडा या ठिकाणी एक दिवा ज्ञानाचा हा अभिनव उपक्रम राबवण्यात आला व त्यामाध्यमातून भारतीय संविधानाने दिलेल्या समता, स्वातंत्र्य, न्याय व बंधुतेचा संदेश व ज्ञानाचा प्रसार करण्याची प्रतिज्ञा करण्यात आली.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, क्रांतीज्योति सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उपस्थित मान्यवरांनी महापुरूषांच्या प्रतिमेसमोर एक एक दिवा लावून अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन दिपक ओव्हाळ, प्रभाकर सरोदे, प्रसाद शेलार, संजय जाधव यांनी केले होते.




यावेळी हरीभाऊ वडमारे, नागेश भोसले, अरविंद कांबळे, प्रदीप कांबळे, शाम गोरे, संजय जाधव, नितीन गायकवाड, मुकुंद गंगावणे, अनिल डिंगीया, अनिल धेंडे व अविराज मराठे इ. मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात विविध पक्ष संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरीक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

नियमित वाचा...
सा. संघर्षाचा आवाज